शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,
१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/पुवि/२०१६-१७ /22249 दिनांक- 30 DEC 2016

प्रति,
मुख्याध्यापक
न्यु सिटी प्राईड इंग्लिश मिडीयम स्कूल रहाटणी, पिंपरी, पुणे

**विषय-** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील तरतुदींनुसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१५-१६ या वर्षापासून इ.५ वी व इ. ८ वीचे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ-** शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१६/प्र.क्र.११/एसएम-५, दि. २० संप्टेबर २०१६.

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थीच्या प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या उच्च प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वीचा वर्ग जोडण्यास अहमदनगर, पुणे आणि सोलापूर जिल्हयातील शाळेस खालील अटींच्या व शर्तीच्या अधिन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे.

| शासन यादी क्र. | संस्थेचे नाव/शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | इयत्ता | ज्या वर्षी पासून मंजूर करावयाचे ते वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ८ | न्यु सिटी प्राईड इंग्लिश मिडीयम स्कूल रहाटणी, पिंपरी, पुणे | इंग्रजी | ८ वी | २०१५-१६ | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर |

**अटी व शर्ती :-**

१. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
२. या आदेशान्वये ज्या शाळांना वर्ग मंजूर करण्यात आले आहेत त्या शाळांची पट संख्या विहित निकषाप्रमाणे असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करावी.
३. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये शाळांनी भौतिक सोई सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
४. या आदेशान्वये मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीच्या वर्गांना शासन मान्यता दिल्यामुळे अनुदानाचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही. या वर्गाना अनुदान लागु करणे हा शासनाचा स्वेच्छा अधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची अंमजबजावणी करण्यात येईल.
५. तसेच शासन निर्णय दिनांक. २८.०८.२०१५ नुसार नैसर्गीक बंद करण्यात आलेली असल्याने इयत्ता ५ नंतर इयत्ता ८ वी नंतर प्रस्तुत शाळांना नैसर्गीक वाढ लागू रहणार नाही.

संदर्भीय शासन निर्णयानुसार आपल्या जिल्हयातील शासनाने मंजूर केलेल्या इयत्ता ५ व इयत्ता ८ वीचे वर्ग जोडण्याबाबत उपरोक्त अटी व शर्तीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास, संचालनालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.१.

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर :-**
मा. शिक्षण संचालक (प्राथ) महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) जिल्हा परिषद पुणे, अहमदनगर, सोलापूर